अध्यक्ष महोदय,

मी आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन सभागृहामध्ये सादर करीत आहे.

" मेक इन इंडिया " उपक्रमाअंतर्गत मुंबईतील कार्यक्रमानंतर देश विदेशातील गुंतवणूकदारांना महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षमतेचे दर्शन अधिक उत्तम रितीने झाले आहे. या उपक्रमाअंतर्गत आपल्या राज्यामध्ये नवीन उद्योग उभे राहून रोजगाराच्या अनेकविध संधी युवकांना प्राप्त होतील, तसेच त्यामुळे राज्याच्या करसंकलनात वृध्दी होईल अशी मला खात्री आहे. या उपक्रमास अनुरुप अशा " ईझ ऑफ डुईंग बिजनेस " अंतर्गत अभिप्रेत असलेल्या सुधारणा करप्रणालीमध्ये करण्यात येत आहेत व त्याचबरोबर करदात्यास व्यवसाय वृध्दीकरीता येवू शकणाऱ्या अडचणींवर योग्य ती उपाययोजना करण्यास कर प्रशासन कटिबध्द आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात घसरलेल्या कच्च्या तेलाच्या किंमतीमुळे करसंकलनावर विपरित परिणाम झाला आहे. पेट्रोल व डिझेलच्या कमी झालेल्या किंमतीमुळे या वस्तूवर आर्थिक वर्षात अंदाजे अठराशे कोटी रुपये अपेक्षित महसूलापेक्षा कमी प्राप्त झाले आहेत. तरीही मला विश्वास आहे की, करसंकलनाची उद्दिष्टपूर्ती करण्यात आम्ही यशस्वी होणार.

**विक्रीकर विभागातील संगणकीकरण**

२. व्यापार व उद्योग जगतास अधिक उत्तम रितीने सेवा देण्याकरिता संगणकीकरणाचा महत्त्वाचा वाटा असेल. करपध्दती सरळ व सोपी असल्यास करदात्यास अनुपालन खर्च कमी येतो व करभरणा देखील योग्य पध्दतीने व वेळेवर करण्यास मदत होते व याकरिता संगणकीय प्रणालीची मदत घेणे आवश्यक ठरते. विक्रीकर विभागाने एसएपी आधारित संगणक प्रणालीचा अवलंब येत्या आर्थिक वर्षामध्ये करण्याची संपूर्ण पूर्वतयारी केली आहे. करदाता वर्गासही नवीन प्रणालीविषयी माहिती देण्यात येत आहे. नवीन संगणक प्रणाली अवलंबानंतर करदात्यास अद्ययावत इनपुट टॅक्स क्रेडीट लेजर उपलब्ध होईल तसेच विक्रीकर विभागाशी केलेल्या सर्व व्यवहारांची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. करदात्यास या पध्दतीने माहिती उपलब्ध करणारे महाराष्ट्र कर प्रशासन हे जगातील निवडक कर प्रशासनापैकी एक ठरेल व याचा सर्व करदात्यांना फायदा होईल याची मला खात्री आहे.

**मूल्यवर्धित कर कायद्यातील सुधारणा**

३. अध्यक्ष महोदय, मूल्यवर्धित कर कायद्यामध्ये तांत्रिक, संगणक प्रणालीशी सुसंगत व कर सुरक्षित करण्याकरिता काही बदल सुचवित आहे.

• वस्तूच्या विक्रीची किंमत बाजारभावापेक्षा कमी दर्शवून देय विक्रीकर चुकविल्याच्या काही घटना निदर्शनास आल्या आहेत. यास्तव, फेअर मार्केट प्राईस ची संकल्पना कायद्यात अंतर्भूत केली जाईल. एखाद्या वस्तूची विक्री करचुकवेगिरीच्या उद्देशाने बाजारभावापेक्षा कमी किंमतीत केली असल्यास अशा विक्रीची फेअर मार्केट प्राईसप्रमाणे कर निर्धारणा करण्याचे अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे.

• करदात्यास नोंदणी घेण्याकरिता त्याला विक्रीकर विभागास भेट देण्याची आवश्यकता नाही. त्याने नोंदणी संदर्भातील सर्व दस्तऐवज ऑनलाईन पाठवायचे आहेत. या दस्तऐवजामध्ये काही फरक आल्यास सुनावणीची संधी न देता नोंदणी अर्ज नामंजूर करण्यात येईल. परंतु, त्याबाबत ठराविक कालावधीत दुरुस्ती करण्याची संधी करदात्यास प्रस्तावित करण्यात येत आहे. या कालावधीत त्रुटींची पूर्तता केल्यास मूळ अर्जाच्या तारखेपासून नोंदणीपत्र देण्यात येईल, मात्र विहित कालावधीत त्रुटी दुरुस्त न केल्यास अर्ज निरस्त होईल. खोटे दस्तऐवज दिल्यास नोंदणी क्रमांक रद्द करण्याचीही तरतूद करण्यात येत आहे.

• करदात्यास त्याने सादर केलेल्या विवरणपत्रामध्ये चूक आढळल्यास त्याला सुधारित विवरणपत्र भरण्याची मुदत मूल्यवर्धित कायद्यामध्ये लेखा परिक्षण अहवाल सादर करण्याच्या तारखेपर्यंत करण्याचे व एकापेक्षा जास्त सुधारित विवरणपत्रे दाखल करण्याचे प्रस्तावित आहे.

• विक्रीकर विभागामार्फत सर्व करदात्यांची निर्धारणा केली जात नाही तर, काही ठराविक निकषांवर आधारित करदात्यांची प्रकरणे निर्धारणेकरिता निवडण्यात येतात. ज्या करदात्यांची प्रकरणे निर्धारणेकरिता निवडण्यात आलेली नाहीत त्या करदात्यास त्याच्या निर्धारणेबाबत स्पष्टता रहावी याकरिता काही शर्तीच्या अधिन राहून ज्या करदात्याने विहित मुदतीत विवरणपत्रे दाखल केली आहेत ती तशीच स्विकृत केली असल्यास त्याला त्याप्रमाणे स्वीकृती आदेश देण्याचे प्रस्तावित आहे. त्याचबरोबर विवरणपत्रे विहित मुदतीत दाखल करणाऱ्या व्यापाऱ्यास वर्ष संपल्यानंतर चार वर्षांपर्यंत निर्धारणेकरिता नोटीस देण्यात आली नसेल तर, त्याची विवरणपत्रे स्विकृत झाली आहेत असे समजण्यात येईल.

• करदात्याच्या निर्धारणा प्रक्रिये दरम्यान निर्धारणा अधिकारी त्या संदर्भात प्रस्तावित कर व व्याज दायित्वाविषयी सूचना पाठवेल व ते करदात्याने स्विकृत केले व त्याप्रमाणे सुधारित विवरण दाखल करुन कराचा भरणा केल्यास त्यास स्वीकृती आदेश देण्यात येईल व निर्धारणा कार्यवाही विसर्ग करण्याचे प्रस्तावित आहे.

• नियोक्त्यांनी कार्यकंत्राटाची रक्कम कंत्राटदारास अदा करताना कार्यकंत्राटदाराकडून टीडीएस वजावट करावी लागते. कार्यकंत्राटदाराने जर कार्यकंत्राट उप-कार्यकंत्राटदारास दिल्यास वजावट केलेली टीडीएस ची रक्कम उप-कार्यकंत्राटदारास हस्तांतरित करता येईल अशी तरतूद प्रस्तावित आहे. तसेच कार्यकंत्राट देणाऱ्या नियोक्त्यांना विक्रीकराअंतर्गत टीडीएस साठी नोंदणी करण्याचे व अशा टीडीएस चे तपशील देणारे विवरण दाखल करण्याची तरतूद करण्यात येत आहे. तसेच याकरिता कसूरदारास शास्ती आकारण्याची तरतूदही करण्यात येत आहे.

• विक्रीकराअंतर्गत विवादित प्रश्नांबाबत आयुक्तांकडून आदेश प्राप्त करुन घेण्याची तरतूद आहे. करदात्यास व्यवहारानंतर वा व्यवहार होण्यापूर्वी विक्रीकर विभागाकडे विहित प्रकारच्या प्रश्नांसंदर्भात आगाऊ अधिनिर्णय आदेश प्राप्त करण्याकरिता अर्ज करण्याची संधी देणारी तरतूद करीत आहे. तसेच या प्रश्नासंदर्भात आदेश देण्याचे अधिकार विक्रीकर आयुक्त, आगाऊ अधिनिर्णय प्राधिकरण यांच्याकडे देवू शकतील, या तरतूदीसंदर्भात मूल्यवर्धित कर कायद्यात अनुषंगिक बदल प्रस्तावित आहेत. विवादित प्रश्नांसंबंधी कलम ५६ रद्द करण्यात येवून त्याखालील प्रलंबित अर्ज देखील या प्राधिकरणास वर्ग करता येतील.

• डिजीटल इंडियाच्या युगामध्ये इ-कॉमर्स कंपनीमार्फत होणाऱ्या व्यवहारांची संख्या वाढत आहे. सदर कंपनीकडून त्यांच्या पोर्टलवरुन होणाऱ्या खरेदी-विक्री व्यवहारांची माहिती नियमितपणे घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच माहिती न देणाऱ्या पोर्टलला शास्ती लावण्यात येईल.

• मेगा प्रकल्पांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री करताना विक्रीच्या देयकावर सदर माल अशा प्रकल्पामध्ये उत्पादित झाला आहे याचा उल्लेख करावा लागतो. त्याचप्रमाणे ओळखपत्र असलेल्या अल्ट्रा मेगा प्रकल्प व १९९३ च्या सामुहिक प्रोत्साहन योजनेखाली विलंबित करदायित्व असलेले व्हेरी लार्ज प्रकल्प यामध्ये उत्पादित मालाच्या विक्री देयकावरही सदर उल्लेख आता अनिवार्य करण्याचे प्रस्तावित आहे.

करविषयक प्रस्ताव

४. अध्यक्ष महोदय, मी आता माझे करविषयक प्रस्ताव सभागृहासमोर सादर करीत आहे.

- **प्रवेश कर :-**

राज्याचा वाजवी महसूल संरक्षित व्हावा या उद्देशाने राज्याबाहेरुन येणाऱ्या काही वस्तूंवर सध्या प्रवेश कराची आकारणी केली जाते. अनेक प्रकारच्या टाईल्सवर प्रवेश कराची आकारणी होते. मात्र ज्यापासून टाईल्सची निर्मिती करण्यात येते त्या मार्बलच्या स्लॅब व ग्रेनाईट स्लॅबवर प्रवेश कर नाही. तफावत दूर करण्याकरिता मार्बल व ग्रेनाईट स्लॅब वर प्रवेश कर आकारण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. त्याचबरोबर प्रवेश कर कायद्यांतर्गत " ईझ ऑफ डूईंग बिझनेस " करिता संगणकीकरण संबंधित आवश्यक बदल करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

- **व्यवसाय कर :-**

➢ व्यवसाय करांतर्गत नाव-नोंदणी न घेतलेल्या व्यावसायिकास त्याने नाव-नोंदणी अर्ज दाखल केल्याच्या मागील आठ वर्षे दायित्वाची परिगणना होवू शकते. आठ वर्षांच्या कालावधीतील करदायित्वामुळे नाव-नोंदणी न घेण्याचे प्रमाण अधिक आहे. अशा व्यावसायिकांस नाव-नोंदणी घेण्यास प्रोत्साहन देण्याकरिता एक विशेष अभियान मी प्रस्तावित करीत आहे, ज्यायोगे अनोंदित कालावधीचे करदायित्व व त्यावरील शास्ती मागील तीन वर्षांपर्यंत सीमित करण्यात येईल. या अभियानाचा फायदा सर्व नाव-नोंदणीस पात्र व्यावसायिक दिनांक १ एप्रिल २०१६ ते ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत अर्ज करुन घेवू शकतील. दिनांक १ एप्रिल २०१६ रोजी प्रलंबित अर्जांनाही याचा लाभ देण्यात येईल. अभियान समाप्तीनंतर व्यवसाय कर विभागामार्फत कसूरदार व्यावसायिकांविरुध्द कडक कारवाई करण्याचे प्रयोजित असून, अशा सर्व कसूरदारांचे सर्वेक्षण करुन त्यांची तपासणी करण्यात येईल व अनोंदित व्यावसायिक ८ वर्षांपर्यंतच्या कालावधीकरिता करपात्र ठरु शकतील. तसेच त्यांना त्या अनुषंगाने येणाऱ्या शास्तीस व अभियोग कार्यवाहीस सामोरे जावे लागेल.

➢ व्यवसाय कराअंतर्गत सशस्त्र सेनादलामध्ये कार्यरत व्यक्तींना करमाफी देण्यात आली आहे. मात्र, केंद्रीय राखीव पोलीस दल तसेच सीमा सुरक्षा दल मध्ये कार्यरत सशस्त्र कर्मचाऱ्यांना व्यवसाय कराची आकारणी होते. केंद्रीय राखीव पोलीस दल व सीमा सुरक्षा दल यांचे सशस्त्र कर्मचारी ठराविक मुदतीकरिताच

राज्यात कार्यरत असतात तसेच इतर अनेक राज्यात त्यांना व्यवसाय कर लागत नाही. यास्तव मी महाराष्ट्रात केंद्रीय राखीव पोलीस दल व सीमा सुरक्षा दल मध्ये कार्यरत अशा सशस्त्र कर्मचाऱ्यांना व्यवसाय करातून सूट देण्याचे प्रस्तावित करतो.

➢ व्यवसाय कराअंतर्गत अनुदानित शैक्षणिक संस्थांनी करभरणा शासकीय यंत्रणेमार्फत केलेला आहे, परंतु, त्यांपैकी काही संस्थांनी अनिवार्य इ-विवरणपत्र दाखल न केल्यामुळे त्यांना विलंब शुल्क आकारण्यात आलेले आहे. तांत्रिक कारणामुळे लावण्यात आलेला हा विलंब शुल्क मी माफ करीत आहे.

- **ऊस खरेदी कर**

साखरेच्या घसरत्या किंमतीमुळे साखर उद्योग अडचणीत आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना सन २०१५-१६ चा ऊस खरेदी कर माफ करण्याचे प्रस्तावित करीत आहे. मात्र, ही सूट जे साखर कारखाने शासनाच्या धोरणाप्रमाणे साखर निर्यात करतील त्यांनाच अनुज्ञेय असेल अशी अटही मी प्रस्तावित करीत आहे.

- **मोटार वाहन कर :-**

राज्यात वैयक्तिक वापरातील दुचाकी व तीनचाकी वाहनांवर ७ टक्के दराने कर आकारला जातो तर वैयक्तिक वापराव्यतिरिक्त म्हणजेच कंपनी, महामंडळे, इत्यादि यांच्या नावे असणाऱ्या वाहनांवर २१ टक्के दराने कर आकारणी होते. मी आता या वाहनांच्या इंजिन क्षमतेवर आधारित कर संरचना प्रस्तावित करीत असून, ९९ सीसी पर्यंतच्या वाहनांकरिता ८ टक्के, १०० सीसी ते २९९ सीसी पर्यंतच्या वाहनांकरिता ९ टक्के, ३०० सीसी व त्यापेक्षा अधिक सीसी वाहनांकरिता १० टक्के कर प्रस्तावित आहे. मात्र कंपनी व महामंडळे इत्यादि यांच्या नावे असणाऱ्या तसेच आयात केलेल्या गाड्यांवर वरील दराच्या दुप्पट दराने कर आकारण्यात येईल.

- **लॉटरी कर :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये चालविण्यात येत असलेल्या ऑनलाईन व पेपर लॉटरीवर कर हा सोडतनिहाय आकारण्यात येत असून, साप्ताहिक लॉटरी योजनेस लागू असलेला सध्याचा ६० हजार रुपये हा कराचा दर ७० हजार रुपये करण्याचे प्रस्तावित करीत आहे. पाक्षिक लॉटरी योजना किंवा सप्ताह व पंधरवडा दरम्यान होणाऱ्या कोणत्याही लॉटरी योजनेस लागू असलेला सद्याचा १ लाख २५ हजार रुपये हा कराचा दर

१ लाख ५० हजार रुपये करण्याचे प्रस्तावित करीत आहे. मासिक लॉटरी योजना किंवा पंधरवड्याहून अधिक असणाऱ्या कोणत्याही कालावधीच्या लॉटरी योजनेस लागू असलेला सद्याचा २ लाख ५० हजार रुपये हा कराचा दर ३ लाख ५० हजार रुपये करण्याचे प्रस्तावित करीत आहे. तसेच भव्यतम (बंपर) लॉटरी योजनेस लागू असलेला सद्याचा १२ लाख रुपये हा कराचा दर १४ लाख रुपये करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

- **मूल्यवर्धित कर :-**

➢ पेट्रोल, डिझेल इत्यादींवरील करवाढ सुरु ठेवणे :- शेतकऱ्यांना द्यावयाच्या पीक नुकसानभरपाई, पीक विमा तसेच एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाच्या खर्चापोटी दिनांक १ ऑक्टोबर २०१५ पासून पेट्रोल व डिझेल, देशी-विदेशी मद्य, सिगारेट, शितपेये, सोने, हिरे व त्यापासूनचे दागिने व नकली दागिने यांवर मी काही प्रमाणात करवाढ केली होती. त्या करवाढीचा मी पुन:श्च विचार केला असून, यापुढील कालावधीतही बळीराजाच्या अडचणी दूर करण्याकरिता आर्थिक तरतूदीची आवश्यकता असणार आहे. त्यामुळे मी सदरची करवाढ आणखी एक वर्ष सुरु ठेवण्याचे प्रस्तावित करीत आहे.

➢ ५ टक्के ऐवजी ५.५ टक्के दराने कर आकारणी :- अध्यक्ष महोदय, वस्तू व सेवा कर पध्दतीच्या अवलंबनामुळे राज्याच्या महसूलात तूट येण्याची शक्यता आहे व त्या तूटीकरिता नुकसानभरपाई देण्याची केंद्र शासनाने तयारी दर्शविली आहे. सदरची महसूलाची नुकसानभरपाई रक्कम, वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीच्या वर्षापूर्वीच्या वर्षांमध्ये राज्याने करापोटी जमा केलेल्या महसूलावर आधारित असेल. त्यामुळे राज्याची मूल्यवर्धित करापोटी जमा होणारी रक्कम सन २०१६-१७ मध्ये अधिक असल्यास वस्तू व सेवा कर प्रणालीच्या अवलंबनानंतर राज्यास योग्य त्या प्रमाणात महसूल भरपाई मिळू शकेल. यास्तव मूल्यवर्धित कराच्या दरामध्ये वाढ करणे संयुक्तिक ठरेल. त्यामुळे मूल्यवर्धित न्युनतम समान दरामध्ये मी अल्पशी वाढ करीत आहे. घोषित माल वगळता, ५ टक्के करपात्र वस्तूंवर मी, ५.५ टक्के कर प्रस्तावित करीत आहे.

➢ केश तेलावरील कराचा दर :- राज्यामध्ये खोबरेल तेलाचा वापर खाद्यपदार्थामध्ये होत नाही तर तो मुख्यत: केश तेल म्हणून होतो. छोट्या पॅकमध्ये विकले जाणारे तेल सर्वसाधारणपणे खाद्यपदार्थामध्ये वापरले जात नाही. त्यामुळे पाचशे

मिलीलिटरपर्यंतच्या पॅकमध्ये विकल्या जाणाऱ्या खोबरेल तेलावर मी ५ टक्क्यावरुन १२.५ टक्के करवाढ प्रस्तावित करीत आहे. तसेच केश तेल औषध म्हणून गणण्यात येवू नये याबाबत मी औषधाच्या नोंदीमधून केशतेल वगळण्याचे प्रस्तावित करीत आहे.

➢ जीवनावश्यक वस्तूंसाठी करमाफी/सवलत :- राज्यात काही जीवनावश्यक वस्तू जसे तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ, हळद, मिरची, चिंच, गूळ, नारळ, धणे, मेथी, सुवा, पापड, ओला खजूर, सोलापूरी चादर यांवर दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत सूट देण्यात आली आहे. सदर सूट दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत चालू ठेवण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. टॉवेल्स दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत करमाफ आहेत. मी आता टेरीटॉवेल्सवर ५.५ टक्के कर प्रस्तावित करीत आहे, याप्रकारचे टॉवेल्स मुख्यतः हॉटेलमध्ये वापरले जातात. त्याव्यतिरिक्त सर्वसामान्य वापरत असलेल्या टॉवेल्सला दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत करमाफी देण्याचे प्रस्तावित करीत आहे. बेदाणे व मनुकांवरील कर सवलत देखील दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत सुरु राहील. चहावरील सवलतीचा करदर ५ टक्केवरुन ५.५ टक्के प्रस्तावित करीत आहे व सदर सवलत दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत चालू राहील.

➢ वार्पिंग व सायझिंग प्रक्रिया उद्योगास करमाफी :- वस्त्रोद्योगामध्ये प्राथमिक टप्पा म्हणजे सुतावर करण्यात येणारी वार्पिंग व सायझिंग प्रक्रिया आहे व या उद्योगामध्ये कार्यरत उद्योजकांवर मूल्यवर्धित कराचे दायित्व आहे. व्यापक रोजगार देणाऱ्या व अल्प मूल्यवर्धन असलेल्या या उद्योगास मूल्यवर्धित करातून सूट देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

➢ मधुमकावरील कर :- मधुमक्यावर प्रक्रिया करुन विकल्या जाणाऱ्या उत्पादनावरील कराच्या दराबाबत संबंधित उद्योगामध्ये संदिग्धता आहे व त्यासंदर्भात प्रकरण न्यायालयाकडे प्रलंबित आहे. संदिग्धता दूर करण्याकरिता मी, या उत्पादनावर ५.५ टक्के कर प्रस्तावित करीत आहे.

➢ काटेरी तारा, तारेची जाळी व साखळी दुवावरील कर :- शेतकरी स्वतःच्या शेताचे राखण करण्यासाठी वापरत असलेल्या काटेरी तारेवर सध्या १२.५ टक्के कर लागू होतो. त्याचबरोबर मुख्यतः शेतकरी वापरत असलेले तारेची जाळी व साखळी दुवा यावरही १२.५ टक्के कर लागू आहे. बळीराजाच्या अल्पशी उतराईकरिता मी यावरील कराचा दर ५.५ टक्के प्रस्तावित करीत आहे.

➢ सरकीवरील कर :- सरकी वर ५ टक्के कराचा दर आहे. सरकी पासून उत्पादित तेलावरही ५ टक्के कर आहे. मात्र, सरकी पेंड ही करमाफ आहे. या कररचनेमुळे सरकी तेल उत्पादकांना कराचा परतावा देय होतो. व्यस्त कररचना सुसंगत करण्याकरिता मी सरकी वरील कराचा दर २ टक्के प्रस्तावित करीत आहे.

➢ बॅटरी व हायब्रीड ऊर्जेवरील बसेसचा कर :- बॅटरी व सौर ऊर्जेवर चालणाऱ्या वाहनांवर ५ टक्के कर आहे. वाहतुकीची कोंडी सोडवण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्त वापर होणे आवश्यक आहे व त्याला प्रोत्साहन देण्याकरिता सार्वजनिक परिवहन उपक्रमांद्धारे प्रवाशी वाहतुकीकरिता खरेदी केलेल्या बॅटरी व संकरित ऊर्जापध्दती (Hybrid) वर चालणाऱ्या बसेसला मी करमाफी प्रस्तावित करीत आहे.

➢ प्लास्टिक व जैविक कचऱ्यापासून तयार होणाऱ्या पॉयरोलिसीस ऑईलवरील कर :- "स्वच्छ भारत " या अभियानाअंतर्गत प्लास्टिक कचरा मोठी अडचण ठरत आहे. प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यामुळे मी प्लास्टिक कचरा व जैविक कचऱ्यापासून तयार होणाऱ्या इंधनावरील (Pyrolysis Oil) कराचा दर १२.५ टक्क्यावरुन ५.५ टक्के प्रस्तावित करीत आहे.

➢ एलईडी टयूबवरील कर :- ऊर्जेची बचत म्हणजेच ऊर्जा निर्मिती. ऊर्जेची बचत करणाऱ्या एल. ई. डी. बल्बवर मी मागील अर्थसंकल्पात १२.५ टक्क्यावरुन ५ टक्के कर प्रस्तावित केला होता. त्याच संकल्पनेवर मी एल. ई. डी. टयूबवर आता ५.५ टक्के कर प्रस्तावित करीत आहे.

➢ विद्यार्थी उपयुक्त वस्तूंवर कर :- विद्यार्थी देशाचे भविष्य आहे. विद्यार्थ्यांकरिता उपयुक्त लेखन साहित्य, पेन्स, गणितीय साधन पेटया, रंगपेटया, लिहिण्याचे पॅडस्, इत्यादि वस्तूंवर ५ टक्के कराची आकारणी होते. मी गतवर्षी आराखडा वही, चित्रकला वही, प्रयोगशाळा वही यांना करमुक्त केले. विद्यार्थ्यांच्या साहित्यावर कमीत कमी कराचा बोजा असावा याकरिता मी पेन्सिल पेटी, सर्व प्रकारचे डिंक, ग्लू व त्याची स्टिक, स्टेपलर पिन, टेप डिस्पेन्सर, डस्टर व सर्व प्रकारच्या फाईल्स यांवरील कराचा दर १२.५ टक्क्यांवरुन ५.५ टक्के प्रस्तावित करीत आहे.

➢ दिव्यांग व्यक्तीच्या वाहनाकरिताच्या रेट्रोफिट किट वरील कर :- दिव्यांग व्यक्तीकरिता वापरात येणाऱ्या काही वाहनांवर करमाफी आहे. मात्र सदर वाहन त्या व्यक्तींना वापरण्यायोग्य होण्याकरिता लागणाऱ्या रेट्रोफिट किट वर १२.५ टक्के कर आहे, त्याला मी करमाफी प्रस्तावित करीत आहे.

➢ वापरलेल्या वाहनाच्या विक्रीवरील कर :- वापरलेल्या वाहनांची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्यांच्या विक्रीवर १.८८ टक्के कराची आकारणी होते. दुर्दैवाने कर्जाचा हप्ता भरु न शकलेल्या व्यक्तीच्या वापरलेल्या वाहनाच्या बँकेतर्फे होणाऱ्या लिलावावर मात्र १२.५ टक्के कर लागू होतो. अशा कर्जधारकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याकरिता मी बँकेतर्फे व वित्तीय संस्थांमार्फत करण्यात येणाऱ्या वापरलेल्या वाहनांच्या विक्रीवर ५.५ टक्के कराचा दर प्रस्तावित करीत आहे. मात्र अशा वाहनांवर आधीच्या टप्प्यावर विक्रीकर अथवा प्रवेश कर भरलेला असावा.

➢ इंजेक्शनमधील निर्जतुक पाणी व मॅमोग्राफीक मशीनवरील कर :- मी मागील अर्थसंकल्प सादर करताना कर्करोगावरील उपचारासाठीची काही आवश्यक औषधे करमुक्त केली. विधीमंडळात अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान माननीय सभासदांनी डायलिसीसची औषधे व उपकरणे यावरील कर माफ करावा अशी विनंती केली होती. त्याचा यथोचित आदर करण्यात आला व त्याप्रमाणे करमाफी देण्यात आली. आजारी व्यक्तीस दिल्या जाणाऱ्या इंजेक्शनमध्ये वापरल्या जाणाऱ्या निर्जंतुक पाण्यावर १२.५ टक्के कर लागू आहे. औषधावरील कर दराशी सुसंगत करण्याकरिता इंजेक्शनमध्ये वापरल्या जाणाऱ्या निर्जंतुक पाण्यावर मी कराचा दर ५.५ टक्के करीत आहे. त्याचबरोबर ब्रेस्ट कॅन्सरच्या पडताळणीकरिता वापरण्यात येत असलेल्या मॅमोग्राफी यंत्रावरील कर मी माफ करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

➢ बांबूपासून बनविलेली हस्तकला उत्पादने :- बांबूपासून बनविलेल्या हस्तकलेच्या उत्पादनास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. बांबूपासून बनविलेल्या फर्निचर व्यतिरिक्त हस्तकला उत्पादनांवर असलेल्या ५ टक्के करास मी करमाफी देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

**आपसमेळ योजना**

५. लघु उद्योजक भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा भाग आहे व रोजगाराच्या अनेकविध संधी उपलब्ध करुन देणाऱ्या लघु उद्योगास प्रोत्साहनाची आवश्यकता आहे. विक्रीकर अंतर्गत करदायित्वाची परिगणना सोप्या पध्दतीने व्हावी व लघुउद्योगास अनुपालन खर्च कमी यावा याकरिता लघु उद्योजकास विविध आपसमेळ योजना देण्यात आल्या आहेत. त्या योजनांमध्ये मी काही बदल प्रस्तावित करीत आहे :-

➢ किरकोळ व्यापार करणाऱ्या करदात्याच्या आपसमेळ योजनेकरिता कमाल वार्षिक उलाढालीची मर्यादा रुपये ५० लाखावरुन रुपये १ कोटीपर्यंत वाढविण्यात येईल.

➢ बेकरी उत्पादने सर्वसामान्यांच्या रोजच्या आहाराचा एक भाग आहे. मुख्यतः स्वयंरोजगाराअंतर्गत केल्या जाणाऱ्या या उद्योगास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. बेकरी उत्पादकास रुपये ५० लाखापर्यंत उलाढालीस आपसमेळ योजनेंतर्गत ४ टक्के कर लागू होतो, मात्र उलाढालीमध्ये ब्रेड व करमाफ बाबींचाही समावेश होतो. आपसमेळ योजनेंतर्गत करआकारणीसाठी उलाढालीमधून करमाफ वस्तू वगळण्यात येतील, असा बदल करण्यात येईल.

➢ रेस्टॉरंट, हॉटेल, इत्यादि व्यापारावर आपसमेळ योजनेअंतर्गत उलाढालीची मर्यादा नाही. अशा सर्व नोंदित व्यापाऱ्यांना ५ टक्के दराने आपसमेळ योजनेखाली कर भरण्याची मुभा आहे. तथापि, आपसमेळ योजना छोटया व्यापाऱ्यांसाठीच अभिप्रेत असल्याने अशा प्रवर्गातील ज्या व्यापाऱ्यांची लगतच्या मागील वर्षाची खाद्यपदार्थ व मद्यविरहित पेयांची उलाढाल रुपये तीन कोटींपेक्षा अधिक आहे, त्यांना आपसमेळ योजनेंतर्गत कराचा दर ८ टक्के असेल.

**खरेदीसंदर्भात करदात्यास अनुज्ञेय वजावट नियमात बदल**

६. विक्रीकराअंतर्गत खरेदी केलेल्या मालावरील कराची वजावट हा महत्वाचा भाग आहे. त्यासंदर्भात महसूलाचा विचार करुन मी विक्रीकर नियमामध्ये काही बदल प्रस्तावित करीत आहे :-

➢ पेट्रोल व डिझेलच्या खरेदीवर भरलेल्या कराची वजावट दिली जात नाही. त्याप्रमाणे या वस्तूंवर देय प्रवेशकराची वजावट देण्यात येणार नाही.

➢ मोबाईल संचाची खरेदी करुन आंतरराज्य विक्री केल्यास खरेदीवर दिलेल्या कराच्या वजावटीचे प्रमाण विक्रेत्याच्या केंद्रीय विक्री कराअंतर्गातील दायित्वाइतकेच असेल.

➢ प्रवासी मोटार वाहनाची खरेदी करुन भाडेतत्वावर वाहन दिले तरी त्यास वजावट दिली जात नाही. त्यामध्ये बदल करुन या पध्दतीच्या व्यवहारावर भाडेतत्वावर देय कराच्या दायित्वाइतका खरेदीवर दिलेल्या कराची वजावट देण्यात येईल.

**संगणकीय देयके**

७. कर महसूलाची वृध्दी, सुयोग्य कर प्रशासनावर अवलंबून असते. शेवटच्या टप्प्यावरील विक्री संदर्भातील अचूक माहिती उपलब्ध व्हावी याकरिता संगणकीय प्रणालीचा वापर संयुक्तिक ठरतो. जे नोंदणीधारक व्यापारी शेवटच्या टप्प्यावर वस्तूंची विक्री करतात त्यांच्याकरिता संगणकीय देयक (डिजिटल बिलींग) पध्दतीचा अवलंब करण्याचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

**लॉजिस्टीक हब**

८. नागपूर परिसरामध्ये लॉजिस्टीक व्यवसायास प्रोत्साहन देण्याकरिता लॉजिस्टीक हबची स्थापना करुन, आंतरराज्यातून प्राप्त केलेल्या मालाचे पॅकींग वा रिपॅकींग करुन पुन:श्च आंतरराज्य विक्री केल्यास त्या मालाच्या विक्रीवर देय केंद्रीय विक्रीकर माफ करणेबाबतचा प्रस्ताव मी हिवाळी अधिवेशनामध्ये मांडला होता. याच संदर्भात केंद्रीय विक्रीकर कायद्या अंतर्गत अधिसूचना जारी करण्यात येईल.

अभय योजना

**९. (अ) विक्रीकर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कायद्याअंतर्गातील थकबाकीकरिता अभय योजना -**

नजिकच्या भविष्यकाळात अंमलात येणाऱ्या वस्तू व सेवा कराच्या पार्श्वभूमीवर बिहार, हिमाचल प्रदेश, गुजरात व मध्यप्रदेश या राज्यांनी विक्रीकराअंतर्गत असलेल्या थकबाकीबाबत अभय योजना जाहीर केल्या आहेत. एखाद्या व्यवहारावर करदेयता किती असेल यासंदर्भात बऱ्याच प्रकरणामध्ये संदिग्धता असते व त्या अनुषंगाने प्रकरणे अपिलीय प्रक्रियेमध्ये प्रलंबित असतात. व्यापाऱ्यांच्या बाजूने निर्णय लागला तरी प्रक्रियेच्या कालावधीत त्याला अनिश्चिततेस सामोरे जावे लागते व शासनाच्या बाजूने निर्णय लागला तरी संबंधित उद्योगावर व्याजाचा बोजा पडतो व उद्योग अवर्धनक्षम होण्याची शक्यता निर्माण होते. या प्रश्नावर साकल्याने विचार करुन तसेच अनेक वर्षे विविध न्यायालयीन प्रकरणामध्ये अडकून पडलेला विक्रीकराचा महसूल उपलब्ध व्हावा व उपलब्ध झालेल्या महसूलाचा उपयोग कल्याणकारी योजनाकरिता व्हावा याकरिता मी विक्रीकर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कायद्यांतर्गातील थकबाकीकरिता अभय योजना देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

अभय योजनेअंतर्गत कराची कोणतीही सवलत देण्यात येणार नाही. ज्या विवादित प्रकरणामध्ये व्यापाऱ्याने अपील दाखल केले असून विवादित रकमेच्या वसूलीबाबत स्थगन आदेश आहेत अशा प्रकरणातच व्यापाऱ्याने विवादित कराच्या रकमेचा पूर्ण भरणा केल्यास व अपील मागे घेतल्यास दिनांक १ एप्रिल २००५ पूर्वीच्या प्रकरणात संबंधित व्याज व शास्ती पूर्णत: माफ करण्यात येईल त्याचप्रमाणे दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २०१२ या कालावधीतील प्रकरणामध्ये विवादित कराच्या पूर्ण भरण्यासह विवादित व्याजाच्या २५ टक्के रकमेचा भरणा केल्यास संबंधित उर्वरित व्याज व संपूर्ण शास्ती माफ करण्यात येईल. व्यापाऱ्यास अभय योजनेअंतर्गत अपिलातील समाविष्ट सर्व मुद्दयांपैकी काही मुद्दयांवरही हा लाभ घेता येईल. ही योजना दिनांक १ एप्रिल २०१६ ते ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत लागू राहील. अभय योजनेची कार्यपध्दती स्वतंत्ररित्या जाहीर करण्यात येईल.

**(ब) महाराष्ट्र औद्योगिक धोरणाअंतर्गत बंद घटकांसाठी अभय योजना :-**

पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद उद्योग घटकांची जमीनीसकटची स्थिर मालमत्ता वापरात येण्याच्या दृष्टीकोनातून अशा उद्योग घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३ ला अनुसरुन विशेष अभय योजना दिनांक २ मे २०१३ ते ३१ मार्च २०१४ व १४ ऑगस्ट २०१४ ते ३१ मार्च २०१५ पर्यंत जाहीर करण्यात आली होती. पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या व बंद उद्योग घटकांकडील शासकीय देणी थकित असल्यास, त्या थकित देणीची मुद्दल रक्कम, घटकाने एक रकमी भरल्यास त्यावरील व्याज व दंडनीय रक्कम माफ करुन त्या उद्योग घटकाची स्थिर मालमत्ता अन्य उद्योजकाकडे हस्तांतरित करण्यास विशेष अभय योजनेद्वारे मान्यता देण्यात आलेली होती. ही योजना दिनांक १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीसाठी नव्याने राबविण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या कर प्रस्तावांद्वारे सुमारे रुपये ३६३ कोटी इतका अतिरिक्त महसूल प्राप्त होईल असा अंदाज आहे. सदर वाढ ही सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अंतर्भूत केली आहे. या प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल असा माझा विश्वास आहे.

जय हिंद! जय महाराष्ट्र !!